# मेट्रो ३ मार्ग! विमानतळ टी २ ते सहार रोडदरम्यानच्या ६९२ मीटरचे भुयारमार्ग १६० दिवसांत पूर्ण

मुंबई- मुंबई मेट्रो ३ मार्गिकेच्या पॅकेज ६ मधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ ते सहार रोड दरम्यान ६९२ मीटरचे भुयार केवळ १६० दिवसात पूर्ण करण्यात आलेले आहे. १६० निष्णात अभियंते आणि कामगारांच्या अथक परिश्रमाने हे भुयार यशस्वीपणे पार करण्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला यश प्राप्त झाले.

तापी १ या टीबीएम मशीन ने दिनांक १३ सप्टेंबर २०१८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापासून ते सहार रोडपर्यंतच्या भुयारीकरणाला प्रारंभ केला. ८९ मीटर इतके लांब तापी १ या टराटेक कंपनीच्या टीबीएमद्वारे प्रतिदिन ४. ३१ मीटर इतक्या वेगाने भुयारीकरण करते भुयारीकरणाप्रमाणेच सहार स्थानकाच्या बांधणीचे काम सर्वात महत्त्वाचे आहे कारण मुंबईची सर्वात जुनी आणि तितकीच महत्वाची जलवाहिनी तानसाला न हलवता त्याच्या खालून सहार मेट्रो स्थानकाच्या बांधणीचे काम करण्यात येत आहे. ब्रेशिया आणि बेसाल्ट यांसारख्या टणक खडकांना भेदत तापी १ ने ४९५ आरसीसी सिमेंट रिंग्सचा वापर करत भुयार तयार केले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या पूर्ण प्रकल्पातील ५२ किमी भुयारीकरणापैकी २० किमीपेक्षा जास्त भुयारीकरण पूर्ण झाले असून एकूण १७ टीबीएम मशीन दहा लॉंचिंग शाफ्टमधून कार्यरत करण्यात आले आहेत